## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

### सूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ अंतर्गत*

*क्रमांकः मुंमप्रविप्रा/निवि/विनिप्रा/मुंमप्रवाअक्षे/प्रकरण-III/वैधानिक/१२४४/११३१/२०२५.*

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "म.प्रा.नि. व न. अधिनियम, १९६६" असे उल्लेखिलेले) च्या कलम ४० चे पोट-कलम (१) च्या खंड (ग) मधील तरतुदीनुसार व त्याअनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या अधिकारांन्वये नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन (यापुढे "शासन" असे उल्लेखिलेले) यांनी अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२२४/०१/ प्र.क्र.१८/२४/नवि-१२, दिनांक ०९ जुलै २०२४ अन्वये, सदर अधिसुचनेच्या (यापुढे "उक्त अधिसुचना" असे उल्लेखिलेले) परिशिष्ट-II, III व IV मध्ये नमूद केलेल्या पालघर जिल्ह्यातील २२४ गावे आणि रायगड जिल्ह्यातील २२३ गावे, असे एकूण ४४७ गावांचा समावेश असलेल्या मुंबई महानगर प्रदेशाच्या वाढीव अधिसुचित क्षेत्राकरिता (यापुढे "उक्त अधिसूचित क्षेत्र" असे उल्लेखिलेले) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे उल्लेखिलेले) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिसुचनाअन्वये सहायक संचालक, नगररचना, पालघर व सहायक संचालक, नगररचना, रायगड-अलिबाग यांना म. प्रा. नि. व न. अधिनियम, १९६६ मधील तरतुदींचा अवलंब करून उक्त अधिसुचित क्षेत्राची विकास योजना व त्याची विकास नियंत्रण नियमावली प्राधिकरणासोबत समन्वय साधून तयार करणे व प्राधिकरणाने ती शासनास मंजुरीकरिता सादर करण्याचे निदेश दिलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस- १२२१/ २४६१/ प्र.क्र.८३/ २१/ ननविप्रा/नवि-१२, दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ अन्वये सदर वाढीव अधिसुचित क्षेत्रामधील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील ०२ गावे भागशः व ०७ गावे पूर्णतः के. एस. सी. नवनगर (KSC New Town) मध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने आपल्या दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या १५८ व्या बैठकीत ठराव क्र. १७२६ अन्वये उक्त अधिसुचित क्षेत्राच्या विकास योजनेसंबंधित आवश्यक ती वैधानिक कामे करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. तसेच, त्याबाबत पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना सर्वतोपरी प्राधिकृत करण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, नियोजन प्राधिकरणाने अधिसुचित क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यापूर्वी आणि क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यापूर्वी प्राधिकरणाच्या ठरावाद्वारे विकास योजना तयार करण्याचा त्यांचा उद्देश म. प्रा. नि. व न. अधिनियम, १९६६ च्या कलम २३ अंतर्गत घोषित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, म. प्रा. नि. व न. अधिनियम, १९६६ चे कलम २३ च्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून उक्त अधिसुचित क्षेत्रामधील **अनुसूची – १** मध्ये नमूद केलेल्या रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पनवेल, पेण व खालापूर तालुक्यामधील क्षेत्राकरिता विकास योजना तयार करण्याचा उद्देश सदरच्या सूचनाअन्वये घोषित करत आहे.

याबाबत नागरिकांच्या सूचना/हरकती सदर सूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ६० (साठ) दिवसांच्या आत, सहायक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, नगरपालिका जुनी प्रशासकिय इमारत, लेले चौक, अलिबाग-४०२ २०१, येथे कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात द्याव्यात.

उक्त अधिसूचित क्षेत्राच्या विकास योजनेत समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा खालील कार्यालयांत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

(१) सहायक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, नगरपालिका जुनी प्रशासकिय इमारत, लेले चौक, अलिबाग-४०२ २०१.

(२) जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, रायगड-अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय, हिराकोट तलावाजवळ, अलिबाग-४०२ २०१.

(३) पनवेल महानगरपालिका, स्वामी नित्यानंद मार्ग, गोखले मंगल कार्यालय समोर, पनवेल- ४०२ १०७.

(४) पेण नगरपरिषद, हुतात्मा भाई चौक, एम. जी. रोड, ता. पेण- ४०२ १०७.

(५) अलिबाग नगरपरिषद, शेतकरी कामगार भवन समोर, अलिबाग, ता. अलिबाग- ४०२ २०१.

(६) खालापूर नगरपंचायत, नगरपंचायत कार्यालय, पो. तालुका खालापूर, जि. रायगड - ४१० २०३.

(७) सह संचालक, नगर रचना, कोकण विभाग, कक्ष क्र. ३०५, तिसरा मजला, कोकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

(८) नियोजन विभाग, सहावा मजला, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नविन प्रशासकीय इमारत, वांद्रे-कुर्ला-संकुल, वांद्रे पूर्व, मुंबई- ४०० ०५१.

(९) प्राधिकरणाचे संकेतस्थळ *https://mmrda.maharashtra.gov.in*

## अनुसूची -१

**रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पनवेल, पेण व खालापूर तालुक्यामधील मुंबई महानगर प्रदेशाचे वाढीव अधिसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची चतु:सीमा खालीलप्रमाणे :**

**पश्चिम -** अरबी समुद्र.

**उत्तर -** अलिबाग तालुक्यातील कुरुळ, वडगाव, पावले, काळोशी, कवीर, बामणगाव, ताडवागळे, वाघोडे, नागझरी, शिरगाव, कालवड, मेढेखार व जुईबापूजी गावांची उत्तर सीमा.
पेण तालुक्यातील डोलवी, कराव व रोडे गावांची उत्तर सीमा आणि महलमिर्या डोंगर, विराणी, बोरगाव, आंबेघर, बेलवडे बु., बेलवडे खु., वळक, निढवली, खरोशी या गावांची उत्तर सीमा.
पनवेल तालुक्यातील पाताळगंगा नदीच्या दक्षिणेकडील भाग.

**पूर्व -** खालापूर तालुक्यातील पाताळगंगा नदीच्या दक्षिणेकडील भाग.

**दक्षिण-** खालापूर, पेण आणि अलिबाग तालुक्यांची दक्षिण सीमा.

**डॉ. संजय मुखर्जी,** भा.प्र.से.,
महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण.

मुंबई,
दिनांक : १८ सप्टेंबर २०२५.

## MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

*NOTICE*

*Under Section 23 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

*No. MMRDA/PD/SPA/MMRENA/CHAPTER -III/STATUTORY/1244/1131/2025.*

Whereas, the Urban Development Department, Government of Maharashtra (hereinafter referred to as "the Government") in exercise of its powers conferred under clause (*c*) of sub-section (*1*) of the Section 40 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the MR&TP Act, 1966") *vide* Notification No. TPS-1224/01/CR-18/24/UD-12, dated 9th July 2024, (hereinafter referred to as "the said notification") declared Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as "the said Authority") as a Special Planning Authority for Mumbai Metropolitan Region's Extended Notified Area (hereinafter referred to as the "said notified area") encompassing of 224 villages of Palghar district & 223 villages of Raigad district, in total 447 villages as specified in the *Schedules- II*, *III & IV* appended to the said notification;

And whereas, the Government, *vide* said notification has directed the Assistant Director of Town Planning, Palghar and Raigad – Alibag to prepare and publish the development proposals and development control regulations for the said notified area after following due procedure as prescribed in the MR&TP Act, 1966 with coordination of the said Authority and directed the said Authority to submit the same to the Government for sanction;

And whereas, the Government, *vide* Notification No. TPS-1221/2461/CR-83/21/NTDA/UD-12, dated 15th October 2024, has included 2 villages partially and 7 villages wholly which were part of Pen taluka, Raigad district in said notified area into KSC New Town ;

And whereas, the said Authority, in its 158th meeting held on 24th September 2024, *vide* resolution number 1726, has approved the proposal to carry out necessary satuatory procedure to prepare Development Plan of the said notified area and authorised Metropolitan Commissioner, Mumbai Metropolitan Region Development Authority to carry out said procedures.

And whereas, under Section 23 of the MR&TP Act, 1966, the said Authority, before carrying out a survey and preparing an existing land use map of the notified area, by a resolution has to make a declaration of its intention to prepare a Development Plan for the said notified area;

And now therefore, in accordance with Section 23 of MR&TP Act, 1966, Mumbai Metropolitan Region Development Authority as the Special Planning Authority, *vide* this notice declares its intention to prepare a Development Plan for the part of the said notified area included in Alibag, Panvel, Pen and Khalapur Talukas in Raigad District mentioned in *Schedule -1* of this notice.

Any suggestions/objections of the public in this regard may be submitted in writing on working days, during office hours to the office of Assistant Director, Town Planning, Raigad-Alibag, Nagarpalika Old Administrative Building, Lele chowk, Alibag- 402 201, within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice.

The plan showing boundary of the said notified area is kept open for inspection by public on working days, during office hours at the following offices.

1. Assistant Director, Town Planning, Raigad-Alibag, Nagarpalika Old Administrative Building, Lele Chowk, Alibag- 402 201.

2. The District Collector and District Magistrate, Raigad, Office of the District Collector, Raigad near Hirakot lake, Alibag - 402 201.

3. Panvel Municipal Corporation, Swami Nityanand Road, Opp. Gokhale Marriage Hall, Panvel- 401 206.

4. Pen Municipal Council, Hutatma Bhai Chouk, M.G. Road, Tal. Pen- 402 107.

5. Alibag Municipal Council, Opp. Shetkari Kamgar Bhavan, Alibag, Tal. Alibag- 402 201.

6. Khalapur Nagar Panchayat, Nagar Panchayat Karyalaya, At. Post Tal. Khalapur, Dist. Raigad- 410 203.

7. Joint Director, Town Planning, Konkan Division, Room No. 305, 3rd Floor, Konkan Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai- 400 614.

8. Planning Division, 6th Floor, Mumbai Metropolitan Region Development Authority, New Administrative Building, Bandra-Kurla-Complex, Bandra East, Mumbai- 400 051.

9. Website of the MMRDA https://*mmrda.maharashtra.gov.in*

*Schedule-1*

Boundaries of the area in Alibag, Panvel, Pen and Khalapur talukas of Raigad district included in Mumbai Metropolitan Region's Extended Notified Area are as below :

*West -* Arabian Sea.

*North-* Northern boundary of Kurul, Vadgaon, Pavle, Kaloshi, Kavir, Bamangaon, Tadvagale, Waghode, Nagzari, Shirgaon, Kalavad, Medhekhar and Juibapuji villages in Alibag Taluka.

The northern boundary of Dolvi, Karav and Rode villages in Pen Taluka and,

The northern boundary of Mahalmirya Dongar, Virani, Borgaon, Ambeghar, Belawde Bk., Belawde Kh., Valak, Nidhwali, Kharoshi villages. Southern part of River Patalganga in Panvel Taluka.

*South -* Southern boundary of Khalapur, Pen and Alibag Taluka.

*East -* Southern part of river Patalganga in Khalapur Taluka.

Dr. SANJAY MUKHERJEE, I.A.S.,
Metropolitan Commissioner,
Mumbai Metropolitan Region Development Authority.

Mumbai,
Dated 18th September 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.




मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सूचना
क्र.मुंमप्रविप्रा/निवि/विनिप्रा/मुंमप्रवा अ.क्षे./प्रकरण -III/वैधानिक /१२४४/११३१ /२०२५

ACCOMPANIMENT TO THE MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY' S NOTICE NO. MMRDA/PD/SPA/MMRENA/ CHAPTER-III/STATUTORY/1244/ /2025.

# रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेन, पनवेल व खालापूर तालुक्यामधील मुंबई महानगर प्रदेशाच्या वाढीव अधिसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची चतु:सीमा दर्शविणारा नकाशा (वि.नि.प्रा.-मुं.म.प्र.वि.प्रा.)

# Map showing boundaries of area in Alibag, Pen, Panvel and Khalapur Talukas of Raigad District included in Mumbai Metropolitan Region's Extended Notified Area (SPA-MMRDA)

## Legend - सूची

- MMR's Extended Notified Area (SPA-MMRDA) / मुंबई महानगर प्रदेशाचे वाढीव अधिसूचित क्षेत्र (विनिप्रा -मुंमप्रविप्रा )
- Taluka Boundary / तालुका हद्द
- Village Boundary / गावाची हद्द

Key Map




प्रमुख ,नगर नियोजन
मुं.म.प्र .वि.प्रा .
Chief, Town Planning
MMRDA

महानगर आयुक्त,
मुं.म.प्र .वि.प्रा .
Metropolitan Commissioner,
MMRDA

Scale / प्रमाण - 1:100,000

0 1 2 4 6 8 Km

N

एमएमआरडीए
MMRDA